रयत शिक्षण संस्था, सातारा
दि.17/12/2024

परिपत्रक क्र. 41

संदर्भ- संस्थेकडील परिपत्रक क्र.23 दि.07/10/2024
संस्थेकडील परिपत्रक क्र.33 दि.19/11/2024

विषय- संस्थेच्या सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व महाविद्यालयांमधील क्लासरुममध्ये अध्यापनासाठी इंटरॲक्टिव्ह पॅनल बसविणेबाबत कार्यवाही करणेबाबत.

संस्थेचे अध्यक्ष मा.शरदरावजी पवार साहेब यांच्या दि.22 सप्टेंबर 2024 रोजीच्या कर्मवीर जयंतीच्या कार्यक्रमाच्यावेळी मनोगतामध्ये व्यक्त केल्याप्रमाणे रयत शिक्षण संस्थेतील सर्व तळागाळातील विद्यार्थ्यांना बदलत्या जगाप्रमाणे अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन शिक्षण देणे व विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वाढविणे या दृष्टीने व विद्यार्थ्यांना सखोल विषयज्ञान या माध्यमातून मिळणे काळाची गरज आहे. यासाठी जुन्या पारंपारिक अध्यापन पध्दतीचा वापर न करता अध्यपाकांनी बदलत्या काळाजी गरज म्हणून अद्ययावत तंत्रज्ञान अवगत करावे व त्याचा वापर आपल्या अध्यापन पध्दतीमध्ये करावा. यासाठी संस्थेचे चेअरमन मा.चंद्रकांत दळवी यांनी संस्थेच्या सर्व वर्गखोल्यामध्ये इंटरॲक्टिव्ह पॅनल बसविण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

इंटरॲक्टिव्ह पॅनल बसविण्यासाठी संस्थेने दि.27/11/2024 रोजी मंजूर टेंडरमधील सर्व कंपन्यांची बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठकीमध्ये LOGIC या कंपनीच्या इंटरॲक्टिव्ह पॅनलचे अपग्रेडेड मॉडेल Logic LT-IR75HX हे निश्चित केलेले आहे. व त्याचा दर **रु.79000/-(GST सहित)** अंतिम करण्यात आलेला असून त्यानुसार सर्व शाखाप्रमुखांनी करारानुसार आपल्या कार्यक्षेत्रातील संस्था डिलर्समार्फत खरेदी करावी. (संस्था डिलर- वितराग कॉम्प्युटर्स प्रा.लि.सांगली- दक्षिण व पश्चिम विभागातील शाखा/ सॉफ्ट-टेक कॉम्प्युटर्स, सातारा- मध्य, उत्तर व रायगड विभागातील शाखा)

शाखाप्रमुखांनी आपल्या शाखेच्या वर्गखोल्या विचारात घेऊन खरेदी करावी. तसेच सदर पॅनल शाखेमधील वर्ग खोल्यांमध्ये जागा निश्चित करुन त्याठिकाणी पॅनल जोडण्यासाठी पावर सप्लाय बसवून घ्यावे तसेच कंपनीच्या प्रतिनिधीकडून त्याचे प्रशिक्षण आपल्या शाखेतील सर्व सेवकांना द्यावे.

सर्व विभागीय कार्यालयांनी याबाबत आपल्या विभागातील सर्व शाखांच्या सर्व वर्गखोल्यामध्ये इंटरॲक्टिव्ह पॅनल बसविण्याचा दृष्टीने निधीची उपलब्धता करुन 31/03/2025 अखेर इंटरॲक्टिव्ह पॅनल बसवून घ्यावेत.

सदर इंटरॲक्टिव्ह पॅनल संस्थेच्या सर्व शाखांमध्ये बसविल्यास आधुनिक तंत्रज्ञाचा वापर झाल्याने संस्थेच्या शिक्षण पध्दतीमध्ये अमुलाग्र बदल होईल व शाखेमधील विद्यार्थ्यांचा संख्यात्मक व गुणात्मक विकास होईल. तसेच त्याचा संस्थेच्या सर्व तळागाळातील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल.

सर्व शाखाप्रमुख व विभागीय अधिकारी यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करुन संस्थेकडे त्याचा अहवाल पाठवावा.

सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा

कार्यवाहीसाठी-
सर्व शाखाप्रमुख / सर्व विभागीय अधिकारी
रयत शिक्षण संस्था

प्रत माहितीसाठी-
मा.चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा
मा.व्हा.चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा
मा.संघटक, रयत शिक्षण संस्था, सातारा
मा.सर्व विभागीय चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा
सहसचिव(उच्च शिक्षण), रयत शिक्षण संस्था, सातारा
सहसचिव(माध्य.), रयत शिक्षण संस्था, सातारा
सहसचिव(ऑडिटर), रयत शिक्षण संस्था, सातारा
मुख्या अकौंट & फायनान्स ऑफिसर, रयत शिक्षण संस्था, सातारा